**सत्र खटला क्र.१४/२०२३**
**शासन वि. सुभाष व इतर**
**निशाणी क्रमांक ५८**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करते की,
माझे नावः– नेहा नारायण वलकले

वयः– २४ वर्षे, व्यवसायः– घरकाम

राहणार – हैद्राबाद, तेलंगणा राज्य

**सरकार पक्षातर्फे सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री. पी.के.जाधव यांच्या मार्फतः–**

मृतक अरविंद नरसींग पिटले हे माझे वडील होते. आरोपी क्र.२ सुनीता अरविंद पिटले माझी आई आहे. आरोपी क्र.१ सुभाष शिंदेला मी ओळखते. माझे लग्न झाले आहे. माझ्या पतीकडचे आडनाव वलकले आहे.

२. दिनांक ०८.१०.२०२२ रोजी मला माझ्या आईचा फोन आला. तिने मला सांगीतले की, माझे बाबा रागात घर सोडून निघून गेले. दुस–या दिवशी सकाळी मी माझ्या आईला फोन करुन माझ्या बाबांबद्दल विचारले. माझ्या आईने सांगीतले की, माझे बाबा घरी परत आलेले नाहीत. मी माझ्या बाबांच्या मोबाईलवर फोन केला पण त्यांचा फोन बंद येत होता. मी माझ्या बहीणीला तसेच माझ्या बाबांच्या बाबांना फोन करुन माझ्या बाबांबद्दल विचारले. पण त्यांना माझ्या बाबांबद्दल काही माहीती नव्हते. दिनांक १०.१०.२०२२ रोजी मी माझ्या आईला फोन करुन माझ्या बाबांबद्दल विचारले तेव्हा माझ्या आईने सांगीतले की ती कामाला चालली आहे आणि ती मला दुपारी फोन करेल. दुपारी माझ्या आईने मला फोन केला आणि सांगीतले की, बाबा परत घरी आलेले नाहीत. दिनांक ११.१०.२०२२ रोजी माझ्या

पतीने मला सांगीतले की, तू तयार हो आपल्याला तुझ्या गावाकडे जायचे आहे. दिनांक ११.१०.२०२२ रोजी मी माझे गाव बालाजीवाडी येथे आल्यानंतर मला समजले की, माझ्या बाबांचा मृत्यू झाला आहे. माझ्या पतीने मला सांगीतले की, आरोपी क्र.१ आणि २ यांनी मिळून माझ्या बाबांना मारले आहे. आरोपी क्र.१ हा माझ्या घरुन जेवणाचा डब्बा घेवून जायचा. मी आजही आरोपी क्र.१ ला पाहिले तर त्याला ओळखू शकते. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली होती.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री.एस.एस.नळेगावकर विधीज्ञ यांच्यामार्फत</u>**

**३.** सन २०१७ मध्ये माझे लग्न झाले. सन २०१७ मध्ये लग्न झाल्यानंतर मी माझ्या पतीसोबत तालूका देगलूर, जि. नांदेड येथे राहत होते. मला आणखी एक बहीण आहे. त्यावेळी माझी आई जागृती साखर कारखान्यामध्ये कामाला होती. माझे वडील त्या कारखान्यामध्ये कधी–कधी कामावर जात होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील कधी–कधी कामावर जात होते म्हणून माझ्या वडीलांच्या डोक्यावर खूप कर्ज झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील दारु प्यायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या डोक्यावर कर्ज होते म्हणून लोक त्यांना पैसे मागण्यासाठी घरी येत होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०९.१०.२०२२ च्या पूर्वी माझी आई लातूर शहरामध्ये राहायला आली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती लातूर येथे मेसमध्ये स्वयंपाक करण्यासाठी जात होती.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११.१०.२०२२ रोजी मी, माझ्या गावच्या घरी माझे दीर व माझ्या सासरच्या लोकांसोबत आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे पती कारमध्ये माझ्यासोबत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की,

मला माझ्या पतीकडून हे समजले नाही की, दोन्ही आरोपींनी मिळून माझ्या वडीलांना मारले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०१०.२०२२ आणि दिनांक ११.१०.२०२२ रोजी माझे वडील कुठे होते याबद्दल मला काही माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोन दिवसांमध्ये माझे बाबा कुठे होते हे माझ्या आईलाही माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या पतीने आणि आजोबाने हे सांगीतले नव्हते की, दोन्ही आरोपींनी मिळून माझ्या बाबांना मारले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–

दि. ३०/०३/२०२६.

(आर.बी.भागवत)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र.२,
लातूर